# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२—२५६१६६३

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : rdtenagpur.org.in


अतितात्काळ

कालमर्यादित

क्रमांक : तंशिस/विकाना/शै.वि/इ.बी.सी/२०१७—१८/२०१८/855

दिनांक : 28 FEB 2018

प्रति,

____________________

____________________

____________________

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषयः— राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना व २) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचे ऑनलाईन पध्दतीने भरेलेले अर्ज जमा करण्याबाबत. शैक्षणिक वर्ष २०१७—१८

संदर्भः— १) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/विकाना/शै.वि/इ.बी.सी/२०१७—१८/२०१८/७६९ दि. २१/०२/२०१८.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/विभा.कार्या. पत्र/संकेतस्थळ —पत्र /२०१८/६९, दि. २६/०२/२०१८.

शैक्षणिक वर्ष २०१७—१८ करीता १) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना व २) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजना मागिल वर्षाप्रमाणे यावर्षीसुध्दा ऑनलाईन पध्दतीने राबविण्यांत येत आहे. सदर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यांची अंतिम दिनांक ०३/०३/२०१८ ठरलेली आहे. सदर ऑनलाईन भरलेले अर्ज संस्थेच्या लॉगिनमधून Approval करण्यांची अंतिम दिनांक १२/०३/२०१८ ठरविण्यांत आल्याबद्दल संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते. ईबीसी च्या ऑनलाईन अर्ज सादर करण्यांची मुदत वाढणार नाही. त्यांमुळे संस्थेने सर्व पात्र विद्यार्थ्याकडून अर्ज भरुन ऑनलाईन Approval करावे.

या पत्राव्दारे आपणांस कळविण्यांत येते की, ज्या संस्थेचे अर्ज भरुन झालेले आहे त्यांनी दि. ०१/०३/२०१८ पासून त्वरित या कार्यालयास फक्त पात्र विद्यार्थ्यांचेच Approval केलेले अर्ज खास प्रतिनिधीमार्फत खालील मुददयांप्रमाणे तपासणी करुन सादर करावे.

१. ज्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी व अर्ज सादर केलेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना सुध्दा DTE संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा ईबीसी मंजूर केली जाणार नाही.

२. ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व त्यासोबत अर्जामध्ये दिलेले प्रमाणपत्र (जसे Admission Confromation Letter, वर्ष २०१६—१७ चे सक्षम अधिका—यांनी दिलेला कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला रु. ६.०० लक्ष च्या आत असलेला, मागिल वर्ष पास/एटीकेटी ची मार्कशिट, अधिवासी प्रमाणपत्र, राशन कार्ड , आधार कार्ड , बॅक पासबुक , आवश्यक असल्यास गॅप सर्टिफिकेट , विद्यार्थ्याचे पालक हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र व अर्जामध्ये नमुद केलेले इतर आवश्यक प्रमाणपत्र)

३. संस्थेने त्यांच्या **ईबीसी लॉगिन मध्ये असलेला मॅसेज बॉक्स दररोज तपासून पहावा. यापुढे त्या मॅसेज बॉक्सव्दारेच तुम्हाला सुचना देण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

४. जे विद्यार्थी अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमात १२ वी नंतर प्रवेशित आहेत त्या विद्यार्थ्यांकडून ११वी व १२वी कोणती सवलत घेतलेली आहे त्याबाबतचे संबंधीत शाळा/महाविद्यालयाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिकारी जसे तहसिलदार, नायब तहसिलदार, एसडीओ यांचे असणे आवश्यक आहे.

६. आपल्या संस्थेच्या अर्जासोबत शैक्षणिक वर्ष २०१६–१७ चे हमिपत्र (इबीसी व्यतिरिक्त अन्य कुठलिही सवलत घेतलेली नाही याबाबतचे) सादर करावे. सदर हमिपत्राचा नमुदा या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.rdtenagpur.org.in Dt. 7/05/2013) उपलब्ध आहे.

७. फक्त ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्जच सादर करावे.

८. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या **अर्जासोबतची सर्व कागदपत्रे सांक्षाकित असणे आवश्यक आहे**. नसल्यास सदर अर्ज रद्द करण्यात येईल.

९. ईबीसी च्या ऑनलाईन अर्ज सादर करण्यांची मुदत वाढणार नाही. त्यांमुळे संस्थेने सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन ऑनलाईन Approval करावे.

१०. सदर योजने चा लाभ विद्यार्थ्यांना मिळण्यांकरिता संस्थेने आवश्यक त्या सूचना वेळोवेळी विद्यार्थ्यांना पुरवाव्यात, पात्र विद्यार्थी या योजने च्या लाभापासून वंचित राहता काम नये.

**वरील बाबींची पुर्तता सर्व विद्यार्थ्यांनी केली असल्याबाबतची खात्री करुन व संस्थास्तरावरच अर्जाची छाननी करुन फक्त ऑनलाईन भरलेले अर्जच या कार्यालयास सादर करावे. अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयास सादर करु नये. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अर्जावर प्राचार्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. अन्यथा आपले संस्थेचे अर्ज तपासणी केले जाणार नाही.**

**(गुलाबराव ठाकरे)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

प्रत:— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना वेबसाईडवर अपलोड करण्याकरीता